**ठळक बातम्या**

- ऊर्जा विभागाच्या तीनही कंपन्यांच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचं मूळ वेतन आणि भत्त्यात वाढ

- नीट युजी संदर्भात फेरपरीक्षेच्या मागणीसह संबंधित २६ याचिकांवर उद्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- भविष्यातल्या उपयुक्त तंत्रज्ञानाच्या गरजेनुसार तरुणांमधलं नवतंत्रज्ञान कौशल्य विकसित करण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं आवाहन

- जम्मू काश्मीरच्या कुलगाम इथं सुरक्षा दलं आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सहा दहशतवादी ठार, तर अकोल्याच्या जवानासह दोन जवानांना वीरमरण

**आणि**

- भारत आणि झिम्बाव्वे यांच्यातल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचं झिम्बाव्वे समोर विजयासाठी २३५ धावांचं आव्हान, अभिषेक शर्मा याचं आंतरराष्ट्रीय टी ट्वेंटी सामन्यातलं पहिलं शतक

**<><><><><>**

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली वीज कंपन्यांतल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात १९ टक्के आणि सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.सह्याद्री अतिथी गृहात ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालच्या वीज कंपन्यांतल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत ते आज बोलत होते. या वीज कंपन्यात महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी

मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा समावेश आहे. सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधीकरता पाच हजार रुपयांची वाढ आणि तांत्रिक कर्मचारी यांना मिळणारा रू.500/- चा भत्ता दुप्पट करण्यात आला आहे, असं फडणवीस यांनी सांगितलं. या बैठकीत तीन्ही कंपन्यांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

नीट युजी ची फेरपरीक्षा घेण्यात यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह संबंधित अन्य २६ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात उद्या सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड आणि इतर दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे.

नीट युजी परीक्षेदरम्यान झालेल्या गैरप्रकारांमुळे ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी याचिकेत केली आहे. मात्र या परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे कोणतेही पुरावे नसल्यानं परीक्षा पुन्हा घेण्याची आवश्यकता नाही, असं केंद्र सरकारनं सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली अर्थसंकल्पपूर्व विचारविनिमय नुकताच पूर्ण झाला. या बैठकांच्या सत्रात संबंधित १० गटांमधले १२० हून अधिक निमंत्रित, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी अर्थशास्त्रज्ञ सहभागी झाले होते. तसंच कामगार संघटना, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र, रोजगार आणि कौशल्य, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग; व्यापार आणि सेवा, उद्योग, अर्थतज्ञ, वित्तीय क्षेत्र आणि भांडवली बाजारासह पायाभूत सुविधा क्षेत्र, ऊर्जा आणि शहरी क्षेत्रांच्या प्रतिनिधींनी या बैठकांमध्ये आपले विचार आणि अपेक्षा मांडल्या.

**<><><><>**

आपल्या प्रदेशाची गरज लक्षात घेऊन भविष्यात कोणतं तंत्रज्ञान आपल्यासाठी उपयुक्त आहे, याचा विचार करा आणि त्यानुसार तरुणांमध्ये नवतंत्रज्ञानाचे कौशल्य विकसित करा, असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी औद्योगिक कंपन्यांना केलं आहे.

विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशन, महिंद्रा ट्रॅक्टर्स, यंत्र इंडिया लिमिटेड यांनी संयुक्तपणं स्थापन केलेल्या वेदिक-महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते. देशाला पेट्रोल-डिझेलमुक्त करण्याचं आपलं ध्येय असल्याचं त्यांनी सागितलं.

ऑर्डिनन्स फॅक्टरी अंबाझरी परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सुरू केलेल्या अद्यावत सुविधा असलेल्या केंद्राचीही गडकरी यांनी यावेळी पाहणी केली.

**<><><><><>**

मुंबईतल्या वरळी इथल्या हिट अँड रन प्रकरणातील कुणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते आज नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. कायदा सर्वांसाठी समान असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल असं ते म्हणाले.

वरळीत आज पहाटे साडे पाचच्या सुमारास दुचाकीवरून जाणाऱ्या एका दांपत्याला गाडीनं दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाला. ज्या गाडीनं धडक दिली ती शिवसेनेचे पालघरचे उपनेते राजेश शहा यांच्या मालकीची आहे. अपघात झाला तेव्हा गाडीत त्यांचा मुलगा मिहिर शहा आणि चालक दोघेही होते. अपघातानंतर हे दोघं पळून गेले. मात्र पोलिसांनी या दोघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गंत लाभार्थी महिलांकडून अर्ज भरून घेणाऱ्या सोलापूर शहरातल्या दोन नेट कॅफे

चालकांविरोधात पोलिसांनी काल गुन्हा दाखल केला. या योजनेचे ऑनलाईन अर्ज भरताना महा-ई सेवा केंद्र अथवा कॅफे चालकांना प्रत्येक अर्जामागे ५० रुपये सरकारकडून दिले जाणार आहेत, त्यामुळे  अर्जदार महिलांकडून शुल्क आकारू नये अशी सूचना सरकारनं केली होती. मात्र या कॅफेचालकांनी महिलांकडून पैसे घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानंतर त्यांच्याविरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

आगामी  विधानसभेची निवडणूक ही महाराष्ट्राच्या अस्मितेची लढाई असेल, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या शिवसंकल्प मेळाव्यात बोलत होते. गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने जाहीर केलेल्या किती घोषणा अंमलात आणल्या, असा प्रश्न उपस्थित करत ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. संपूर्ण थकबाकीसह शेतकऱ्यांचं वीज बिल माफ करण्याची मागणी त्यांनी केली. एकमेकांशी भांडण्यापेक्षा एकजुटीनं आपल्या मागण्या केंद्राकडून पूर्ण करून घेण्याचं आवाहन ठाकरे यांनी केलं. यावेळी भाजपचे नेते  राजू शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षात प्रवेश केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी २२ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियन फेडरेशनचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून मॉस्कोमध्ये उपस्थित असतील. दोन्ही देशांमधल्या संपूर्ण बहुआयामी संबंधांचा आढावा दोन्ही नेते घेतील. रशियाचा दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री मंगळवारी ऑस्ट्रियाला पोहोचतील. ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहॅमर

यांनी मोदी यांची व्हिएन्ना भेट हा विशेष सन्मान असल्याचं सांगत आपण या भेटीची आतुरतेनं वाट पाहत असल्याचं म्हटलं आहे. गेल्या ४१ वर्षांतली भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच ऑस्ट्रिया भेट असेल. व्हिएन्ना इथं मुक्कामा दरम्यान, मोदी ऑस्ट्रियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतील आणि चांसलर नेहॅमर यांच्याशी चर्चा करतील.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात काल सुरक्षादल आणि दहशतवादी यांच्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत सहा  दहशतवादी ठार झाले तर दोन जवानांना वीरमरण आलं. या दोघांपैकी एक जवान महाराष्ट्रातल्या अकोला जिल्ह्यातला आहे. कुलगाम मध्ये चिन्नीगाम आणि मोडेरगाम इथं दहशतवादी लपून बसल्याची खबर कळताच सुरक्षा दलांनी तातडीनं कारवाई केली. मोडरगम इथल्या चकमकीत अकोला जिल्ह्यातल्या मोरगाव भाकरे इथल्या प्रवीण प्रभाकर जंजाळ या जवानाला हौतात्म्य आलं. प्रवीण जंजाळ यांचे पार्थिव विमानानं नागपूरला आणण्यात येणार असून त्यानंतर ते त्यांच्या मूळगावी नेलं जाणार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या लष्करी इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**<><><><><>**

डोंबिवली एमआयडीसी मधल्या एका केमिकल कंपनीला केमिकल ड्रमचा स्फोट झाल्यानं आज दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास आग लागली. कंपनीत काम करणारे कर्मचारी वेळीच बाहेर पडल्याने कुठलीही जीवित हानी झाली नाही. ही आग कंपनीच्या रिऍक्टरजवळ पोहोचण्यापूर्वीच अग्निशमन विभागाने अवघ्या काही मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवल्यानं मोठी दुर्घटना टळली.

**<><><><><>**

भारत आणि झिम्बाव्वे यांच्यातल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारतानं झिम्बाव्वे समोर विजयासाठी २३५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून पहिली फलंदाजी करायचा निर्णय घेतला. त्यानंतर अभिषेक शर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांनी दुसऱ्या गड्यासाठी १३७ धावांची भागीदारी केली. अभिषेक यानं आंतरराष्ट्रीय टी ट्वेंटी सामन्यातलं आपलं पहिलं शतक झळकावत १०० धावा केल्या. तर ऋतुराज यानं नाबाद ७७, आणि रिंकू सिंग यानं नाबाद ४८ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा झिम्बाव्वेच्या दहाव्या षटकात ५ बाद ७२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पंढरपूर इथं आषाढी एकादशी आणि भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता आजपासून श्री विठ्ठलाचं दर्शन २४ तास सुरु राहणार आहे. भाविकांना आता २६ जुलै पर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणीचं चोवीस तास मुखदर्शन, तर २२ तास १५ मीनिटे पदस्पर्श दर्शन घेता येईल, अशी माहिती, मंदिर प्रशासनाचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. याशिवाय दर्शन रांगेत शेड, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालयं तसंच बसण्याची सुविधा करण्यात आली आहे.

**<><><><><>**

लातूरच्या विवेकानंद प्रतिष्ठानच्या विवेकानंद रुग्णालयामार्फत गेल्या १८ वर्षांपासून आषाढी वारीतल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी वैद्यकीय पथक पायी दिंडीत सहभागी होत असतं. यावर्षीही हे पथक आजपासून १७ जुलै पर्यंत वारकऱ्यांच्या मोफत वैद्यकीय सेवेसाठी रवाना झालं आहे. या पथकात विवेकानंद रुग्णालयाचे २ डॉक्टर, ६ कर्मचारी तसेच रुग्णवाहिकेचा समावेश आहे. या पथकाकडून दिंडीतल्या वारकऱ्यांना गरजेनुसार मोफत उपचार आणि औषधी पुरवली जाणार आहे.

**//<><><><><>//**